दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ


LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार २३ सप्टेंबर २०२५ | अंक २७४ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

**आजचा दिनविशेष**

१८०३ : दुसरे अँग्लो–मराठा युद्ध: ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी आणि भारतातील मराठा साम्राज्य यांच्यातील अष्टाची लढाई.






## महाराष्ट्रावर मोठं संकट, २९ जिल्ह्यांना मंगळवारी पावसाचा हाय अलर्ट,



महाराष्ट्रात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला आहे, पावसामुळे राज्यात प्रचंड नुकसान झालं आहे. याचा मोठा फटका हा मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात बसला आहे. विदर्भातही शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. महाराष्ट्रात सुरू असलेल्या अतिमुसळधार पावसामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पुराचं संकट निर्माण झालं आहे, अनेक गावांना पुराचा वेढा पडल्यानं संपर्क तुटला आहे, काही ठिकाणी पुराच्या पाण्यात लोक अडकल्याचं पहायला देखील मिळत आहे. तर काही ठिकाणी पूल पाण्याखाली गेल्यानं वाहतूक देखील ठप्प झाली आहे. यातच आता चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे, ती म्हणजे पुढील काही दिवस तरी राज्यात पावसाचा जोर कायम राहणार असल्याचा इशारा हवामान विभागाकडून (IMD) देण्यात आला आहे. राज्यात उद्या मुसळधार पावसाचा इशारादरम्यान महाराष्ट्रात पुन्हा एकदा भारतीय हवामान विभागाकडून अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, आयएमडीकडून वर्तवलेल्या अंदाजानुसार पुढील 24 तासांमध्ये पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार पुढील 24 ते 48 तासांमध्ये मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि उत्तर महाराष्ट्र अशा सर्वच विभागांमध्ये जोरदार पावसाची शक्यता असून, सर्वत्र पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

आयएमडीनं वर्तवलेल्या अंदाजानुसार उद्या मराठवाड्यात नांदेड वगळता सर्व सातही जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता आहे. दुसरीकडे विदर्भात देखील उद्या पावसाचा जोर वाढणार आहे. विदर्भाला देखील यलो अलर्ट देण्यात आला आहे. विदर्भातील गडचिरोली, वाशिम, वर्धा, चंद्रपूर, बुलढाणा आणि यवतमाळ या सहा जिल्ह्यांमध्ये मंगळवारी अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

# त्यांना रोजगार हमीचं काम द्या.धनंजय मुंडेंच्या त्या वक्तव्यावर जरांगे पाटलांचा खोचक टोला



### धनंजय मुंडे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे, आता माझ्या हाताला काम द्या, असं त्यांनी म्हटलं

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली, या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला, या प्रकरणानंतर राज्यात वातावरण चांगलंच तापलं. दरम्यान या प्रकरणात वाल्मिक कराड याचं नाव आलं, वाल्मिक कराड हा धनंजय मुंडे यांच्या जवळचा मानला जात असल्यानं, धनंजय मुंडे यांच्या देखील अडचणीत वाढ झाली, विरोधकांकडून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत होती, अखेर धनंजय मुंडे यांनी आपल्या तब्येतीचं कारण पुढे करत आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला, मात्र आता पुन्हा एकदा धनंजय मुंडे यांना मंत्रिपदाचे वेध लागल्याचं दिसून येत आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचा रायगडमध्ये जाहीर सत्कार सोहळा पार पडला, या कार्यक्रमात बोलताना धनंजय मुंडे यांनी सुनील तटकरे यांच्याकडे मोठी मागणी केली, 'माझ्या हाताला आता काहीतरी काम द्या. कायम आम्हाला मार्गदर्शन करत राहा. आम्ही चुकलो तर कान धरा, पण आता आम्हाला रिकामं ठेवू नका. आम्हाला जबाबदारी द्या,' असं मुंडे यांनी म्हटलं आहे. मुंडे यांच्या या मागणीमुळे आता चर्चेला उधाण आलं असून, त्यावर आता मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. काय म्हणाले जरांगे पाटील? धनंजय मुंडे यांच्या या मागणीवर जरांगे पाटील यांनी खोचक टोला लगावला आहे. धनंजय मुंडे यांचे हात रिकामे आहेत, त्यांना रोजगार हमीचं काम द्या, त्यांना बराशी खोदायला पाठवा असं मनोज जरांगे पाटील यांनी मुंडे यांना म्हटलं आहे. दरम्यान मराठ्यांच्या नादाला लागू नका, अन्यथा अजितदादांना पण सोडणार नाही, त्यांचाही कार्यक्रम लावणार असा इशाराही यावेळी जरांगे पाटील यांनी दिला आहे. दरम्यान मुंडेंच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना त्यांनी ओबीसी आंदोलनाच्या लढ्यात यावं अशी प्रतिक्रिया मंत्री छगन भुजबळ यांनी दिली होती, त्यावरून देखील जरांगे पाटील यांनी निशाणा साधला आहे.

## 23-सप्टेंबर रोजी मूळ आदिवासींचा जनआक्रोश मोर्चा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट -२३-सप्टेंबर रोजी सकल मूळ आदिवासींचा आरक्षण बचाओ जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचे १५-सप्टेंबर रोजी प्रा.किशन मिराशे, संतोष मरसकोल्हे, देवेंद्र कोवे, पवनकुमार मडावी, आशिष उर्वते, राजू डोलारकर, फुलाजी येरमे, गुलाब मडावी यांच्या शिष्ठमंडळाने सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करुन आदिवासींच्या आरक्षणातील घूसखोरी थांबवण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. किनवट शहरातील हुतात्मा गोंडराजे शंकरशहा रघूनाथशहा मैदानातून २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता मोर्चाला सुरुवात होणार आहे. या मैदानापासून महात्मा फुले, छत्रपती शिवाजी महाराज चौक,जिजामाता चौक मार्गे सहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. दरम्यान आदिवासींच्या पारंपारीक वेशभुषेत शेकडो मोर्चेकरी सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देणार आहेत.या जनआक्रोश मोर्चात तमाम सकल मूळ आदिवासी समाज बांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन सकल मूळ आदिवासी समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्रचंड पावसाने शेतकऱ्यांची काढणीयोग्य पिके पाण्यात तत्काळ ओला दुष्काळ जाहीर करा– उल्हास गिराम



बीड (प्रतिनिधी ) जिल्ह्यात परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे खरीप पिकांची अवस्था वाईट झाली होती त्यातच परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांची उभी व काढणीयोग्य पिके उध्वस्त झालेली असून शेतकऱ्यांना या या अस्मानी संकटातून बाहेर काढण्यासाठी महायुती सरकारने तात्काळ बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट मदत करावी, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा प्रमुख उल्हास गिराम यांनी केली आहे

आष्टी, पाटोदा, शिरूर, गेवराई तालुक्यातील जवळपास सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे मुख्य नद्या व उपनद्याना आलेल्या महापुरामुळे काही शेतकऱ्यांच्या जमिनीतील माती खरडून वाहून गेली आहे. शेतामध्ये पुराचे पाणी साचून राहिल्याने पिके व फळबागांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे अती पावसामुळे रस्त्यावरील पूल वाहून गेले आहेत असून घरांचीही मोठ्या प्रमाणात पडझड झालेली आहे त्यातच विजेचे खांब कोसळल्या मुळे लोकांना अंधारात रहावे लागत आहे अनेक शेतकऱ्यांच्या पशुधनाची ही जीवित हानी झाली आहे. अनेक शेतकऱ्याने शेती साठी कर्जे काढून बी बियाणे, खते, औषधी खरेदी केलेली होती पिके जोमात असतानाच या अस्मानी संकटाने हाता तोंडाशी आलेला घास हिरावून गेला आहे आधीच आर्थिक संकटात असलेला शेतकरी या संकटामुळे पुरता हवालदिल झाला असून त्यांना तात्काळ मदत मिळणे गरजेचे आहे पण प्रशासन कागदी घोडे नाचविण्यात व्यस्त आहे महायुती सरकारने तात्काळ शेतकऱ्यांना सरसकट मदत देऊन बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा नसता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष तीव्र स्वरूपाचे आंदोलन करेल असा इशारा जिल्हा प्रमुख उल्हास गिराम यांनी दिला आहे

## प्रचंड पावसाने शेतकऱ्यांची काढणीयोग्य पिके पाण्यात तत्काळ ओला दुष्काळ जाहीर करा– अशोक पवार



बीड (प्रतिनिधी ) जिल्ह्यात परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे खरीप पिकांची अवस्था वाईट झाली होती त्यातच परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांची उभी व काढणीयोग्य पिके उध्वस्त झालेली असून शेतकऱ्यांना या या अस्मानी संकटातून बाहेर काढण्यासाठी महायुती सरकारने तात्काळ बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट मदत करावी, अशी मागणी शेतकरी आंदोलन समितीचे सदस्य अशोक पवार यांनी केली आहे


बीड तालुक्यातील जवळपास सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे मुख्य नद्या व उपनद्याना आलेल्या महापुरामुळे काही शेतकऱ्यांच्या जमिनीतील माती खरडून वाहून गेली आहे. शेतामध्ये पुराचे पाणी साचून राहिल्याने पिके व फळबागांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे अती पावसामुळे रस्त्यावरील पूल वाहून गेले आहेत असून घरांचीही मोठ्या प्रमाणात पडझड झालेली आहे त्यातच विजेचे खांब कोसळल्या मुळे लोकांना अंधारात रहावे लागत आहे अनेक शेतकऱ्यांच्या पशुधनाची ही जीवित हानी झाली आहे. अनेक शेतकऱ्याने शेती साठी कर्जे काढून बी बियाणे, खते, औषधी खरेदी केलेली होती पिके जोमात असतानाच या अस्मानी संकटाने हाता तोंडाशी आलेला घास हिरावून गेला आहे आधीच आर्थिक संकटात असलेला शेतकरी या संकटामुळे पुरता हवालदिल झाला असून त्यांना तात्काळ मदत मिळणे गरजेचे आहे पण प्रशासन कागदी घोडे नाचविण्यात व्यस्त आहे महायुती सरकारने तात्काळ शेतकऱ्यांना सरसकट मदत देऊन बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा नसता शेतकरी आंदोलन समितीच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करेल असा इशारा शेतकरी आंदोलन समितीचे सदस्य अशोक पवार यांनी दिला आहे

## उमापुर सह अनेक गावांना पावसाने झोडपून काढल



गेवराई तालुक्यात रविवारी रात्री पावसाचा कहर, भोजगावला पाण्याचा वेढा, गेवराई तालुक्यातील उमापूर शेवगाव राज्य मार्गासह राक्षसभुवन व चकलांबा रस्त्यावरील वाहतूक बंद सकाळी पाच तास गेवराई शेवगाव राज्य रस्ता बंद धोंडराई नदीवर पाण्याचे साम्राज्य धोंडराई फुल पाण्यात भोजगावलगतच्या अमृता नदीला महापूर आला असून गावाला पाण्याचा वेढा बसला आहे. अनेक घरात पाणी शिरून धान्य, कपड`, फर्निचर जनावरांचा चारा वाहून गेला. त्याचबरोबर गंगावाडीचा पूल पाण्याखाली, तर माटेगाव येथे नदीला आलेल्या महापुरामुळे शाळा व घरे पाण्यात बुडाली आहेत. परिणामी उमापूर-शेवगाव राज्य मार्गासह राक्षसभुवन व गेवराई-चकलांबा रस्ता वाहतुकीसाठी बंद झाले आहेत. शेतकऱ्यांचे_अतोनातनुकसान मागील काही दिवसांपासून अतिवृष्टीमुळे उध्वस्त झालेली खरीप पिके रविवारी झालेल्या ढगफुटी सदृश पावसामुळे पूर्णतः नष्ट झाली आहेत. शेतशिवारात पाणीच पाणी असून शेतकऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा राहिला आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने मदतीसाठी पुढे यावे अशी मागणी होत आहे.गेवराई अतिवृष्टी शेतकरी नुकसान मदत करण्यात यावी अशी शेतकऱ्याकडून मागणी होत आह

## मॉडर्न माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचा जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत द्वितीय क्रमांक



नाशिक जिल्हा क्रीडा अधिकारी आयोजित नासिक मनपा जिल्हास्तरीय खो - खो स्पर्धा घेण्यात आली यात एकूण ५२ संघांनी स्पर्धेत भाग घेतला होता.

मॉडर्न माध्यमिक विद्यालय, अशोक नगर, सातपूर या विद्यालयातील संघाने सदर खो खो स्पर्धेत द्वितीय क्रमांकचे यश संपादन केले. संघनायक रणवीर पाटील, करण निकम, सौरभ कदम, प्रणव वानखेडे, आर्यन सूर्यवंशी, प्रणव पाटील, पार्थ आहिरराव, हर्षल बोरसे, सोम भामरे, संकेत गोपाळ, अनुश थोरात, धीरज भोये, मानस थोरात, व आदित्य अहिरे या सर्व यशस्वी खेळाडूंचे, तसेच मुख्याध्यापक डॉ.अनिल माळी, व प्रशिक्षक श्री योगेश ओहोळ, श्री. कांतीलाल महाले, व्यवस्थापक श्री. अशोक बोरसे तसेच क्रीडा शिक्षकांचे संस्थेचे सेक्रेटरीः यु वाय कुलकर्णी, कार्याध्यक्षः रंगनाथ शिरसाट व शालेय समिती चेअरमन सौ. सुचिता कुकडे तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले

## महापूराने शेती गेली खोदून; बळीराम गवतेंकडून नुकसानीची पाहणी

### सिंदफणा, विद्रूपाच्या पुराने शेतकऱ्यांचे नुकसान, पंचनाम्यासाठी तहसीलदारांना फोन

बीड: सोमवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे बीड मतदारसंघातील सिंदफणा, विद्रूपा नदीला महापूर आला होता. यामुळे नदीकाठच्या जमीनी खोदून गेल्या असून राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी सकाळी सात वाजल्यापासून मतदारसंघातील आढावा घेत पारगाव, साक्षाळपिंप्री आदि गावात जावून नुकसानीची पाहणी केली. यावेळी तहसीलदार यांच्याशी फोनवरून संपर्क साधून तातडीने पंचनामे करण्याबाबत चर्चा केली.बीड मतदारसंघात सोमवारी रात्री मुसळधार पाऊस झाला. यामुळे सर्व नद्यांना महापूर आलेला आहे. बीड शहरातून वाहणारी बिंदूसरा नदी दुथडी भरून वाहत असून शहरातील विविध भागात नाल्यातील पाणी दुकानात शिरून मोठे नुकसान झाले. सकाळी सात वाजल्यापासून राष्ट्रवादीचे नेते बळीराम गवते हे मतदारसंघातील आढावा घेत होते.



बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा, शिरूर, गेवराई आणि बीड तालुक्यात नदीच्या पुराचा सर्वाधिक फटका बसलेला आहे. शिरूर तालुक्यातून वाहणारी सिंदफणा नदी मोठी असून या नदीला अनेक वर्षानंतर मोठा पुर आलेला आहे. ही नदी बीड मतदारसंघातून वाहते. साक्षाळपिंप्री परिसरात अनेक छोट्या नद्या सिंदफणाला येऊन मिळतात, यामुळे नदीने रौद्रावतावर धारण केला होता. साक्षाळपिंप्री येथील पुलावरून सायंकाळपर्यंत पाणी वाहत होते. याठिकाणी नदीचे पात्र जवळपास २२ फुट खोल असले तरी पाण्याने नदीपात्र सोडून शेतीवर कब्जा केला होता. यामुळे नदीकाठच्या शेतातील पिके सद्यस्थितीत पाण्यात आहेत, अशी माहिती ग्रामस्थांनी बळीराम गवते यांना दिली होती. तर पारगाव येथील विद्रूपा नदीलाही महापूर असून याठिकाणाहून वाहणाऱ्या दुसऱ्या छोट्या नदीलाही कधी नव्हे ते मोठा पूर आल्याने येथील वहिती शेती पिकांसह वाहून गेल्याची माहिती सरपंच श्रीकांत नवले यांनी दिली. दरम्यान, बळीराम गवते यांनी दोन्ही ठिकाणी जावून नुकसानीची पाहणी केली. यावेळी गवते यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना संपर्क करून नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, याबाबत चर्चा केली. यानंतर साक्षाळपिंप्री येथील वाहतूक बंद असलेल्या पुलावर भेट देवून त्याठिकाणी आलेल्या नागरिकांशी संवाद साधला. यावेळी नदीकाठी घरे असलेल्या नागरिकांनी सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे, काहीही अडचण आली तर संपर्क करा, मी तुमच्या मदतीला प्रशासन घेवून येईल. नुकसानग्रस्तांना मदत मिळवून देण्यासाठी पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी करू, नुकसानीची सर्व माहिती देवू, असा शब्द दिला. यावेळी साक्षाळपिंप्री येथील शेकडो ग्रामस्थांची उपस्थिती होती.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २३ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## पोटाचा त्रास सतावतोय ? रामदेव बाबांनी सांगितलेली ही योगासनं ठरतील फायदेशीर



लठ्ठपणा, अपचन आणि गॅसेसची समस्सया वाढली की पोटाचे अनेक त्रास सतावतात. जड अन्नपदार्थ खाल्ल्याने किंवा नीट, वेळेवर न जेवल्याने , या सवयींमुळे गॅसेस, बद्धकोष्ठता, अपचन यासारख्या समस्या जाणवू लागतात. बरेच लोक पहिल्यांदा या समस्यांकडे खूल लक्ष देत नाहीत, हलक्यात घेतात, पण हळूहळू याच समस्यांचे मोठ्या आजारात रुपांतर होऊ शकते. आपलं पोट जेव्हा खराब असते तेव्हा थकवा, चिडचिड आणि रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊ शकते. पण फक्त औषधोपचार हा त्यावरचा उपाय नाही; तर योग आणि योग्य आहार हे देखील दीर्घकाळ निरोगी पोट राखण्यास मदत करू शकतात. स्वामी रामदेव यांनी काही सोप्या योगासनांची माहिती दिली आहे, ती केल्याने बद्धकोष्ठता, वेदना किंवा अपचन यासारख्या पोटाच्या समस्यांमधून आरा मिळू शकतो, ती फायदेशीर ठरतात. या आसनांचा नियमित सराव केल्याने पोटाचे आजार कमी होतात आणि पचनसंस्था सुधारते. या योगासनांबद्दल आणि ते कसे करायचे ते जाणून घेऊया.

1) मंडूकासन-

मंडूकासन हे एक असे आसन आहे ज्यामध्ये तुम्ही गुडघ्यांवर बसून, तुमचे पाय मागे वाकवायचे असतात. त्यानंतर पुढे वाकून पाय हातांनी धरावे लागतात. आणि पुढे वाकून तुमचे पाय हातांनी धरावे . फायदे –

पोटावर हलका दाब पडतो,
पोटाच्या अवयवांना मालिश होते,
पोटाची सूज कमी होते,
अपचनाची समस्या कमी होते.अन् लवकर पचतं.
बद्धकोष्ठतेचा त्रास दूर होतो.

2) पवनमुक्तासन –

या आसनामध्ये जमीनीच्या दिशेने पाठ टेकून झापोवे, त्यानंतर दोन्ही गुडघे पोटाजवळ खेचून घेऊन पकडावे. या स्थितीत थोडा वेळ तसेच रहावे. यामुळे गॅस बाहेर पडतो आणि पोटाची सूज कमी होते.

फायदे –
गॅस आणि वेदनांपासून आराम
पोटदुखी कमी होते.
वायूच्या समस्या कमी होतात.
पोटात फुगणे कमी होते.
मुले आणि वृद्ध दोघेही वापरू शकतात.

3) भुजंगासन –

या आसनात पोटावर झोपावं आणि त्यानंतर सापासारखे उठणं समाविष्ट आहे. याला कोब्रा पोज असेही म्हणतात. पोटाच्या आजारांमुळे अनेकदा कंबर आणि मणक्याचा ताण वाढतो. पण या आसनामुळे न हा ताण कमी होण्यास मदत करते.

# मुळव्याध माहिती व चिकित्सा - डॉ.विश्वंबर पवार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट सर्वसाधारणपणे पचनक्रिया बिघडल्यामुळे, वारंवार संडासला गेल्यामुळे, संडास कडक आल्यामुळे, संडासला जोर लावल्याने किंवा इतर कारणांमुळेसंडासच्या किंवा गुदमार्गाच्या ठिकाणच्या रक्तवाहिन्या फुगतात किंवा जाड होतात त्यालाच कोंब किंवा मुळव्याध असे म्हणतात. मुळव्याध होण्याची कारणे :- मुळव्याध होण्याचे अनेक कारणे आहेत प्रामुख्याने अनियमित जीवनशैली त्यामध्ये अवेळी जेवण, झोप, जागरण करणे, तळलेले, मसाल्याचे, बाहेरचे, हॉटेलचे, फास्ट फूड, चायनीज इत्यादी पदार्थांचे सेवन करणे. त्याचबरोबर वांगे, हिरवी मिरची, अति प्रमाणात पपई, लसून, चमकोरा, पुरण पोळी, तिळाची पोळी, अंडे, मच्छी, उपवास करणे, शाबूदाणा खाणे, मोटार सायकलवर अति प्रवास करणे, बिडी, दारू, सिगारेट इत्यादी चे व्यसन करणे.त्याचबरोबर स्त्रियांमध्ये गर्भिणी अवस्था व प्रसूतीनंतर मुल्व्याधाचा त्रास होणे, उष्ण गुणधर्मांचे औषधी, काढे, वेदनाशामक किंवा antibiotic चा जास्त प्रमाणात वापर करणे, वारंवार संडास लागत असेल तेंव्हा संडास कमी होण्याच्या गोळ्या खाण्यात आल्यास, ताप कमी हिण्याच्या गोळ्या खाण्यात आल्यास किंवा इतर आजाराच्या जास्त प्रमाणात गोळ्या खाण्यात आल्यास मुळव्याध होतो. अनुवंशिकतेमुळे मुळव्याध होतो.

मुळव्याधाचे प्रकार :- मुळव्याधाचे अनेक प्रकार आहेत.मुळव्याधाचे स्थानानुसार दोन प्रकार आहेत.1) आतील मुळव्याध (Internal) 2) बाहेरील मुळव्याध (External) मुळव्याध हा रक्तवाहीण्याच्या ठिकाणी होतो किंवा इतर ठिकाणी होतो त्यावरून याचे दोन प्रकार आहेत.1) Primary piles 2) Secondary piles रक्त पडण्याच्या प्रकारावरून दोन प्रकार आहेत.1) रक्त ाचा मुळव्याध (Bleeding piles) 2) बिना रक्ताचा मुळव्याध (Non bleeding piles) आकारावरून




किंवा होऊन किती दिवस झाले आहेत यावरून त्याच्या चार स्टेजेस आहेत.1) First Stage 2) Second Stage 3) Third Stage 4) Fourth Stage मुळव्याधाची लक्षणे :- सर्वसाधारणपणे संडासच्या वेळेस रक्त पडणे, आग होणे, दुखणे, ठस ठस करणे, खाजणे, हाताला कोंब लागणे, संडास साफ न होणे, संडास कडक होणे, संडास कडक आल्यावर रक्तस्त्राव व वेदना जास्त होणे, पोटात गॅस होणे, पोट भारी भारी वाटणे इत्यादी लक्षणे असतात. चिकित्सा :- मुळव्याध हा नवीनच झाला असेल रक्तस्त्राव व वेदना कमी असेल, पहिल्या किंवा दुसऱ्या स्टेज मध्ये असेल, संडासची जागा तपासून योग्य निदान झाले असेल तर अशा अवस्थेतील मुळव्याध हा केवळ आयुर्वेद औषधी उपचाराने व काही पथ्य पाळल्याने कायमस्वरूपी कमी होतो. यामध्ये ऑपरेशन किंवा इतर गोष्टींची आवश्यकता पडत नाही.

मुळव्याध होऊन बरेच महिने किंवा वर्ष झाले असेल, रक्त स्त्राव व वेदना जास्त प्रमाणात असेल, मुळव्याध तिसऱ्या किंवा चौथ्या स्टेजमध्ये असेल, औषधी घेतल्यास तात्पुरता आराम वाटत असेल पुन्हा काही कारण घडल्यास पुन्हा त्रास होत असेल अशा अवस्थेतील मुळव्याध हा औषधी उपचाराने कमी होत नाही अशा अवस्थेतील मुळव्याध हा इंजेक्शन, लेझर व क्षारसुत्राद्वारे ऑपरेशन केल्यानंतर कमी होतो.

**डॉ. विश्वंबर पवार**
**डॉ. सुरेखा पवार**
**निवघेकर आयुर्वेदिक हॉस्पिटल,**
**डॉक्टर्स लाईन, नांदेड.**
**9881166777**

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचे यथार्थ दर्शन घडवणारे पुस्तक म्हणजे छत्रपती गडपती : शहाजी उमाप

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जागतिक वारसा प्राप्त झालेल्या बारा किल्ल्यांचे यथार्थ दर्शन घडवणारे पुस्तक म्हणजे "छत्रपती गडपती" आहे, असे प्रतिपादन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप सर यांनी केले.

ते प्रख्यात वक्ते, लेखक प्रा. संतोष देवराये यांच्या "छत्रपती गडपती" या पुस्तकाच्या विमोचन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. याप्रसंगी मंचावर नांदेड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव, माजी प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर, संस्थेचे खजिनदार, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. उदयरावजी निंबाळकर, भाऊराव चव्हाण सहकारी साखर उद्योग समूहाचे अध्यक्ष तथा कार्यकारणी सदस्य नरेंद्रदादा चव्हाण मराठा सेवा संघाचे जेष्ठ मार्गदर्शक मधुकरराव देशमुख,महात्मा



फुले हायस्कूलच्या मुख्याध्यापिका एस. आर. कदम, प्रकाशक इंजि. तानाजीराव हुसेकर, प्रशालेचे उपमुख्याध्यापक अरुण कल्याणकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी युगप्रवर्तक राजे, छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठवाड्याचे भाग्यविधाते,देशाचे माजी गृहमंत्री, ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी श्रद्धेय डॉ. शंकररावजी चव्हाण साहेब यांच्या प्रतिमेला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून अभिवादन केले.

सौ.अनुपमा पाटील यांनी सुमधुर आवाजात जिजाऊ वंदना सादर केली. पुढे बोलताना शहाजी उमाप म्हणाले, की संतोष देवराये हे इतिहासाचे गाढे अभ्यासक असून फर्डे वक्ते आहेत. एक हाडाचे शिक्षक आणि प्रामाणिक व्यक्तिमत्त्व असणाऱ्या देवराये यांनी यापूर्वी देखील अनेक वैचारिक आणि ऐतिहासिक पुस्तकाचे उत्तम लेखन केले आहे. "छत्रपती गडपती" हे त्यांचे पुस्तक त्यांच्या पुस्तक लेखनातील शीर्षबिंदू ठरेल, असा आशावाद त्यांनी शेवटी व्यक्त केला.

या प्रसंगी नरेंद्रदादा चव्हाण, ॲड उदयरावजी निंबाळकर डॉ. रावसाहेब शेंदारकर सर,डॉ. महेशकुमार डोईफोडे ,पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी पुस्तकाचे विशेष कौतुक करून लेखकाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून लेखक प्रा. संतोष देवराये यांनी पुस्तक लेखनाची भूमिका विशद करून छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार तरुणांच्या डोक्यात जावे, त्यांच्या किल्ल्यांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, हा उद्देश असल्याचे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन व्याख्याते रमेश पवार यांनी केले, तर आभार इंजि. प्रवीण जाधव यांनी मानले. कार्यक्रमासाठी श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीतील विविध शाळा, महाविद्यालयांचे अध्यापक,विद्यार्थी, मराठा सेवा संघ परिवारातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# बीड जिल्ह्यात डॉक्टरांकडून गोरगरिबांची लूट; प्रशासनाकडून कारवाईची मागणी — शेख एहतेशामुद्दीन

बीड (प्रतिनिधी):बीड जिल्ह्यात खाजगी डॉक्टरांकडून गोरगरिब जनतेची आर्थिक पिळवणूक सुरू असल्याचा आरोप काँग्रेस (आय) पक्षाचे शहर उपाध्यक्ष शेख एहतेशामुद्दीन यांनी केला आहे. रुग्णसेवेच्या नावाखाली गरिबांकडून अवास्तव दराने फी आकारली जात असून, किरकोळ आजारांसाठीही हजारोंच्या बिलांची वसुली होत असल्याचा त्यांनी आरोप केला आहे. शेख एहतेशामुद्दीन यांनी म्हटले की, "जिल्ह्यातील अनेक डॉक्टर स्वतःच्या मेडिकल स्टोअर्सद्वारे औषधांना बाजारभावापेक्षा जास्त दर लावून रुग्णांची आर्थिक लूट करत आहेत. त्यांनी पुढे सांगितले की, "ओपीडी फी, एक्स-रे, सोनोग्राफी, सिटी स्कॅन, आयसीयू सुविधा तसेच शस्त्रक्रियांसाठी ठराविक आणि पारदर्शक दर लागू करणं गरजेचं आहे. परंतु सध्याची परिस्थिती पाहता, सामान्य माणसाला खाजगी रुग्णालयांचा खर्च परवडणारा राहिलेला नाही." शेख एहतेशामुद्दीन यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्यमंत्री डॉ. तनाजी सावंत आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याकडे मागणी केली




आहे की, अशा प्रकारे रुग्णांची लूट करणाऱ्या डॉक्टरांवर कठोर कारवाई करण्यात यावी. गरज भासल्यास संबंधित डॉक्टरांचा परवाना रद्द करण्याची शिफारस देखील त्यांनी केली आहे. "डॉक्टर हे देवाचे दुसरे रूप मानले जाते, पण आजच्या व्यापारीकरणाच्या युगात काही डॉक्टरांनी हा दर्जा गमावला आहे," अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. बीड जिल्ह्यातील आरोग्य सेवांमध्ये पारदर्शकता आणि जबाबदारी यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर ठोस पावले उचलावीत, अशी मागणी स्थानिक जनतेकडूनही होऊ लागली आहे.

# बीडमधील ऊसतोड कामगारांवरील 'कूस' लघुपटाला राज्यस्तरीय तिसरे पारितोषिक

**– मंत्री नरहरी झिरवाळ, अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते वितरण – केजचे सुपुत्र, पत्रकार जीवराज चोले यांची निर्मिती**

बीड : ऊसतोड मजूर महिलांचे आरोग्य व त्यांचे जगणे मांडणाऱ्या 'कूस' या लघुपटाला राज्यस्तरीय उत्कृष्ट लघुपट म्हणून तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. या लघुपटाची निर्मिती उचित मीडिया सर्व्हिसेसने केली असून, दिग्दर्शन व लेखन डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांनी केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार) चित्रपट व सांस्कृतिक विभागातर्फे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त 'अजितपर्व' या लघुपट महोत्सवाचे आयोजन केले होते. या स्पर्धेत आगीनफूल लघुपटास प्रथम, तर चंद्रलेखा लघुपटास द्वितीय पारितोषिक मिळाले. या स्पर्धेत राज्यभरातून ३५० पेक्षा अधिक लघुपटांनी सहभाग घेतला होता. त्यातून कूस लघुपटाने तिसरा क्रमांक मिळवला. राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ व प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे




यांच्या हस्ते 'कूस' लघुपटाच्या टीमला सन्मानित करण्यात आले. पुण्यातील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्रात आयोजित कार्यक्रमावेळी ज्येष्ठ अभिनेते अरुण नलावडे, चित्रपट महामंडळाचे मेघराज राजेभोसले, अभिनेत्री देविका दफ्तरदार, अभिनेते मिलिंद दास्ताने, सुनील गोडबोले, प्रभाकर मोरे, असित रेडीज, राष्ट्रवादीच्या नेत्या वैशाली नागवडे, रुपाली ठोंबरे, बाबा धुमाळ, संयोजक बाबासाहेब पाटील, नितीन धवणे पाटील, आदित्य संजयराव, अपेक्षा चव्हाण आदी उपस्थित होते. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले. निर्माता जीवराज चोले व दिग्दर्शक डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांनी हे पारितोषिक स्वीकारले. ५५,५५५/- रुपये, मानचिन्ह व सन्मानपत्र असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे. अभिनेता विठ्ठल काळे यांना उत्कृष्ट अभिनेता हा पुरस्कार मिळाला. यावेळी कार्यकारी निर्माती तेजस्विनी थिटे, अभिनेता अनिल कांबळे, अभिनेत्री डॉ. सोनाली घाटणेकर, वेशभूषाकार भाग्यश्री राऊत, केशभूषाकार प्राजक्ता लोंढे, सहायक कलादिग्दर्शक लखन चौधरी आदी उपस्थित होते.

## कूस' कादंबरीवर आधारित लघुपट

बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजूर महिलांचे जगणे, त्यांच्या मासिक पाळीचा व आरोग्याचा प्रश्न, गर्भाशय पिशवी काढण्याचे प्रकार आणि त्यातून होणारी त्या स्त्रीची, कुटुंबाची कुचंबणा आदी गोष्टी या लघुपटातून मांडण्यात आल्या आहेत. डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांच्याच अनेक पुरस्कारप्राप्त 'कूस' या कादंबरीवर आधारित हा लघुपट असून, निर्माता व लेखक-दिग्दर्शक ऊसतोड मजूर कुटुंबातून आल्याने अतिशय वास्तविक रूपात तो मांडला गेला आहे. विठ्ठल काळे यांच्यासह अनुया कळसकर, वैशाली केंजळे, डॉ. सोनाली घाटणेकर, अनिल कांबळे व जीवराज चोले यांच्या यामध्ये प्रमुख भूमिका आहेत.`

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २३ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## 90 टक्के लोकांना माहिती नाहीत, क्रेडिट कार्डशी संबंधित 'या' गोष्टी जाणून घ्या




आज आम्ही तुम्हाला क्रेडिट कार्डची अशी माहिती सांगणार आहोत, जी तुमच्यासाठी खूप महत्त्वाची आहे. आपणास माहित आहे काय की बरेच क्रेडिट कार्ड प्रदाता (कंपनी) त्यांच्या ग्राहकांना क्रेडिट कार्ड तसेच विम्याचा लाभ देतात. आज आम्ही तुम्हाला क्रेडिट कार्डवर मिळणाऱ्या विमा लाभांबद्दल माहिती सांगणार आहोत. चला तर मग याविषयीची माहिती पुढे जाणून घेऊया.

आजकाल क्रेडिट कार्डचा वापर खूप वाढत आहे. बहुतेक लोक आता देयके देण्यासाठी क्रेडिट कार्ड वापरत आहेत. विशेषत: नोकरी करणारे लोक क्रेडिट कार्डचा प्रचंड वापर करत आहेत. क्रेडिट कार्डने पैसे भरल्यावर सवलत, कॅशबॅक आणि रिवॉर्ड पॉइंट्स यासारखे अनेक फायदे आहेत, जे बऱ्याच लोकांना आकर्षित करतात, परंतु आपल्याला माहित आहे का की बरेच क्रेडिट कार्ड प्रदाता त्यांच्या ग्राहकांना क्रेडिट कार्ड तसेच विम्याचा लाभ देतात. आज आम्ही तुम्हाला क्रेडिट कार्डवर मिळणाऱ्या विमा लाभांबद्दल सांगणार आहोत.

**क्रेडिट कार्डसह विमा लाभ**

अनेक कंपन्या आपल्या क्रेडिट कार्डसह ग्राहकांना विम्याचा लाभही देतात. येथे विशेष म्हणजे हा विमा ग्राहकाला कोणत्याही प्रीमियमशिवाय उपलब्ध आहे. यात अपघात विमा, प्रवास विमा, रोजगार विमा, फसवणूक व्यवहार कव्हर, खरेदी संरक्षण विमा यासारख्या विम्याचा समावेश आहे.

**क्रेडिट कार्ड विमा कसे कार्य करते?**

क्रेडिट कार्डधारकाचा मृत्यू झाल्यास क्रेडिट कार्डसह जीवन विमा कामी येतो. अशा परिस्थितीत, कंपनी क्रेडिट कार्डचे थकीत बिल स्वतःच भरते.

बेरोजगारी विम्याच्या बाबतीत, क्रेडिट कार्ड धारकाला क्रेडिट कार्डची किमान देय रक्कम भरण्याची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे, अपंगत्व विम्यामध्ये, धारक काम करण्यास असमर्थ असल्यास धारकाला किमान देय रक्कम भरणे आवश्यक नाही.

क्रेडिट कार्डसोबत ट्रॅव्हल इन्शुरन्स देखील उपलब्ध आहे, ज्यामध्ये प्रवासादरम्यान झालेल्या नुकसानीची भरपाई केली जाते. क्रेडिट कार्डपासून क्रेडिट कार्डपर्यंत फायदे वेगवेगळे असू शकतात.

**इन्शुरन्ससाठी खरेदी करा 'हे' क्रेडिट कार्ड**

क्रेडिट कार्डद्वारे विमा मिळविण्यासाठी, आपण एचडीएफसी बँक रीगलिया कार्ड, ॲक्सिस बँक प्रिव्हिलेज कार्ड, कोटक रॉयल सिग्नेचर कार्ड, इंडसइंड ऑरा कार्ड, आयसीआयसीआय बँक रुबिक्स, पीएनबी ईएमटी रुपे प्लॅटिनम यासारखे क्रेडिट कार्ड खरेदी करू शकता.

(डिस्क्लेमर: या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती व उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत. आमचा याला दुजोरा नाही. ते अवलंबण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा.)

# माजलगाव नगरपरिषद मध्ये अधिकारी व टेंडरधारकांनी मिळुन पाणीपुरवठा टेंडरात केला करोंडाचा भ्रष्टाचार –शेख रशिद

## कित्येक वर्षांपासून ठेवलेला जुना टेंडर रद्द करुन नविन टेंडर देण्याची मागणी

माजलगाव – लोक इच्छा प्रतिनिधी नगरपरिषद हि भ्रष्टाचारांची माहेरघर झाले असुन पाणी पुरवठा टेंडर,स्वच्छता टेंडर, मालमत्ता कर टेंडर अश्या वेगवेगळ्या टेंडर प्रक्रिया मुळे भ्रष्टाचार वाढलेला आहे.अधिकारी , कर्मचारी व टेंडरधारक मिळुन करोंडो रुपयेंचा भ्रष्टाचार झालेला आहे हयाचाच भाग म्हणून ७ ते ८ वर्षांपासून पाणीपुरवठा टेंडर प्रत्येक महिन्याला ,वर्षाला टेंडर वाढिव करीत असुन हयात अधिकारी,कर्मचारी व टेंडरधारक मिळुन आर्थिक देवाणघेवाण करुन नगरपरिषदचा चुना लावायचे काम करत आहेत त्यामुळे माजलगाव नगरपरिषद मधील पाणीपुरवठा टेंडर रद्द करुन नवीन टेंडर प्रक्रिया अवलंबून नविन टेंडर घेण्यात यावे नसता जिल्हाधिकारी कार्यालय समोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी मुख्याधिकारीला निवेदन दिले आहे.

नगरपरिषद मध्ये पाणीपुरवठा टेंडर ७,८ वर्षांपासून एका टेंडरधारकाला देण्यात आले असुन माजलगाव शहरात पाणी पुरवठा टेंडर मध्ये करोंडो रुपयेंचा भ्रष्टाचार झालेला असुन धातुर मातुर कामगार दाखवुन लाखोंचा



बील पास करून राज्य सरकारला चुन्या लावण्याचा प्रकार चालु आहे. पाणीपुरवठा कामगारांचे हजेरीपट नुसार किमान वेतन देण्यात येत नाही, झक्र भेटत नाही, ईन्सुरन्स नाही, कामगारांची हजेरी पट नाही तसेच शहरातील पाणीपुरवठाचे नियोजन ढासळलेली आहे व आर्थिक देवाणघेवाण घेऊन जुना टेंडरलाच अजुन मुदतवाढ वाढवुन पुन्हा ३ वर्षे डबल त्याच जुन्या टेंडरधारकाला देण्यात आले आहे हयाची सविस्तर चौकशी करून जुना पाणीपुरवठा टेंडर रद्द करुन नवीन पाणीपुरवठा टेंडर घेण्यात यावे नसता लोकशाही मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालया समोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ते शेख रशिद यांनी दिला आहे.

# सध्या दिसे नवरंगाची नवलाई !!

सध्या "नवरात्रोत्सव" सुरू आहे. त्यामुळे घरापासून ते कार्यालयापर्यंत, रंगाची शेड पाहायला मिळत आहे. काही वर्षांपूर्वी, एका नामांकित दैनिक वृत्तपत्रात, "नऊ दिवसांच्या नऊ रंगाची तारीख व वार" सहीत जाहिरात प्रसिद्ध झाली. आणि हळू हळू त्याचा 'प्रचार व प्रसार' सर्वश्रुत झाले. आणि पाहता पाहता, जिकडे तिकडे, एकाच रंगाचे "वेगवेगळ्या छटा" पाहायला मिळाले.

त्या निमित्ताने, त्या त्या रंगात मिसळून, स्त्री व पुरुष अर्थात, काही कर्मचारी "मनाने आणि रंगाने" एकत्रित येऊन, कामाच्या वातावरणात 'एकाच रंगात' न्हाऊन जातात. त्यामुळे सध्या बस मध्ये- रेल्वे मध्ये, जिकडे तिकडे एकाच रंगाचे, 'मंगलमय रंगमय' वातावरण उत्साही दिसत आहे.

आणि विशेष म्हणजे, सरकारी आणि निमसरकारी तसेच आस्थापनात, सर्व नऊ दिवस का होईना, पण एका पातळीवर असतात. त्यामुळे कोण वरिष्ठ आणि कोण कनिष्ठ, गरिब व श्रीमंत हा 'भेदभाव' दिसून येत नाही. किंबहुना 'जाणवतही' नाही. हा एक मोठा फरक मला जाणवले. कोणीही तनावात नाही, जो तो हसमुख चेहरा दिसत आहे. मात्र, एक दुसऱ्यांच्या रंगाचे किंवा, कपड्याचे हळूच कुतूहलाने 'निरिक्षण' केले जाते. पण आनंदी वातावरणात. आणि दुसऱ्याच दिवशीच, सर्व वेगवेगळ्या दैनिक वृत्तपत्रांमध्ये त्या दिवसाचे वेगवेगळ्या समुहाचे "त्या रंगाचे रंगीत फोटोही" प्रसिद्ध होतात.

नऊ दिवस, जसं जमेल तसं, आपणही ह्यांच्या रंगांत, मिसळण्याचा प्रयत्न, अती सामान्य लोकंही करत असतात. पण त्यामुळे, ह्या नऊ दिवसांत गरिब- श्रीमंत असा 'भेदभाव' दिसून येत नाही. आणि गणवेश धारी मंडळी



तर, मग ते उच्च दर्जाचे असो, किंवा सामान्य दर्जाचे नोकरी- व्यवसाय करणारे असो. अशा लोकांना, कधी गणवेश उतरवतो आणि, कधी ह्या बाहेरच्या रंगात, आपला रंग मिसळवून जातो, असं वाटतं. आणि मग एकदा का, आपला रंग मॅच झाला की, त्या चेहरा वरचा "आनंद द्विगुणित" होताना, त्या डोळ्यात मी पाहिले. मग तो, पुरुष असो की महिला असो, वा तरुण असो की, बालक पालक. यांच्या "रंगाचा आनंद" वेगळाच असतो. म्हणून "निर्व्याज आपुलकीची वागणूक" ह्या नऊ दिवसांत पाहायला मिळते. आणि मला तर, असे वाटते की, दर महिन्याला शेवटच्या दिवशी 'एक दिवस रंगांचा दिवस' म्हणून, प्रयोग करायला काहीच हरकत नाही. आणि तसं व्हायला हवे. असं माझं वैयक्तिक मत आहे. आपले काय मत आहे ?

~ रंगश्री विलास देवळेकर

# प्रा. प्रज्ञा पंडित यांना 'आदर्श विद्यारत्न पुरस्कार

भारतीय जनता पार्टी पदवीधर प्रकोष्ठ व शिक्षक आघाडी, महाराष्ट्र राज्य तसेच आदर्श शैक्षणिक समूह, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रेरणादायी सोहळ्यात प्रा. प्रज्ञा पंडित यांना आदर्श विद्यारत्न पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले. हा विशेष पुरस्कार "त्रिशताब्दीतून झळकलेली अहिल्यागाथा" या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून विधान परिषद सभापती मा. ना. प्रा. राम शिंदे उपस्थित होते. यावेळी पनवेल विधानसभा आमदार मा. आ. प्रशांत ठाकूर, मार्तंड देव संस्थानचे विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर, रायगड जिल्हाध्यक्ष मा. श्री. अविनाश कोळी, शिक्षक आघाडीचे संयोजक मा. प्रशम कोल्हे, विचुंबे ग्रामपंचायत सरपंच मा. श्री. प्रमोद भिंगारकर, आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्ष मा. श्री. महेंद्र विसपुते तसेच आदर्श शैक्षणिक समूह संचालिका मा. सौ. संगीता विसपुते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या कार्यगौरवाचा उत्सव ठरलेल्या या कार्यक्रमात



निबंध स्पर्धेची पारितोषिके तसेच शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा "आदर्श विद्यारत्न पुरस्कार २०२५" ने गौरव करण्यात आला. या पुरस्काराने सन्मानित होणे म्हणजे पुढील वाटचालीसाठी प्रेरणा ठरावी, हा यामागील हेतू असल्याचे आयोजकांनी सांगितले. या सोहळ्यात प्रा. प्रज्ञा पंडित यांचा विशेष सन्मान करण्यात आला. प्रा. पंडित या प्राध्यापिका, लेखिका, समीक्षक, निरुपणकार तसेच प्रज्ञा स्तोत्र अध्ययन वर्ग, ऑल इंडिया पोएट्री असोसिएशन आणि तेजस्वी फाऊंडेशनच्या संस्थापिका आहेत. साहित्यिक, धार्मिक आणि शैक्षणिक विषयांवर त्यांची तब्बल २१ पुस्तके प्रकाशित झाली असून त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते. पुरस्कार स्वीकारताना प्रा. पंडित यांनी हा सन्मान अधिक जबाबदारीची जाणीव करून देणारा असून शिक्षण व समाजकारणासाठी आपले कार्य पुढेही मनापासून सुरू राहील, अशी भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे आयोजक व पदवीधर प्रकोष्ठ प्रदेश संयोजक तथा आदर्श शैक्षणिक समूह चेअरमन श्री. धनराज विसपुते यांनी या उपक्रमाच्या माध्यमातून अहिल्याबाई होळकरांचे कार्य जनतेपर्यंत पोहोचवण्याची बांधिलकी व्यक्त केली. "हा पुरस्कार व ग्रंथ प्रकाशन सोहळा संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी ठरेल," असे गौरवोद्गार विधान परिषद सभापती मा. श्री. रामजी शिंदे व पनवेल विधानसभा आमदार मा. श्री. प्रशांत ठाकूर यांनी काढले तसेच मार्तंड देव संस्थान विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर यांनी विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या सहभागातून घडलेला हा उपक्रम समाजजीवनाला मूल्याधिष्ठित दिशा देणारा असल्याचे गौरवोद्गार काढले. अहिल्याबाई होळकर यांच्या प्रेरणादायी कार्याचे स्मरण करून देणारा हा भव्य समारंभ विद्यार्थ्यांपासून ते शिक्षकांपर्यंत सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.

# युवा समिती भोरगाव लेवा पाटीदार पंचायत कल्याण शहर कार्यकारिणीची स्थापना

कल्याण:( प्रतिनिधी–सुनील इंगळे ) कल्याण येथील लेवा पाटीदार समाज मंडळाच्या कार्यालयात भोरगाव लेवा पाटीदार पंचायतच्या कल्याण शहर युवा समितीच्या नवीन कार्यकारिणीची स्थापना करण्यात आली. या सभेच्या अध्यक्षस्थानी लेवा मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. युवराज चौधरी सर होते.लेवा पाटीदार समाजातील तरुणांच्या उपस्थितीत झालेल्या या सभेत युवा समितीच्या अध्यक्षपदी श्री. योगेश चौधरी यांची एकमताने निवड करण्यात आली. तसेच कार्याध्यक्ष म्हणून श्री.दीपक चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून युवा समिती प्रमुख श्री. मयुरेश नरेंद्र कोल्हे,लेवा पाटीदार समाज मंडळ, कल्याण चे कार्याध्यक्ष श्री.युवराज चौधरी सर,लेवा पाटीदार समाज मंडळ कल्याणचे सहसचिव श्री.दीपक नेमाडे,ज्येष्ठ सदस्य श्री.रमेशकाका धांडे, जिल्हा सदस्य श्री.तुषार लिलाधर चौधरी,श्री. राकेश रमेश इंगळे,अंबरनाथ शहर समितीचे श्री.किरण नेमाडे, श्री.प्रशांत पाटील,आणि श्री.नीलेश झांबरे व ईतर समाज बांधव उपस्थित होते.

नवनिर्वाचित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे:अध्यक्ष: श्री. योगेश सुभाष चौधरी,कार्याध्यक्ष: श्री.दीपक पुंडलिक चौधरी,

सहकार्याध्यक्ष:श्री.तुषार भारंबे,उपाध्यक्ष:श्री.सागर हेमराज बोंडे,सौ.विना नेमाडे,सचिव:श्री. विनय धांडे,सहसचिव:श्री.किरण पाचपांडे,श्री.पंकज जावळे.

खजिनदार: श्री.दीपक भारंबे

सदस्य:श्री.निनू झोपे,श्री.रोशन इंगळे,श्री. मोहन महाजन,श्री.अमोल खडके,महिलासदस्य:सौ.मोनाली उदय राणे.सौ.विजया पाटील. सौ.अश्विनीपाटील.सल्लागार सदस्य: श्री. राकेश इंगळे कायदेशीर सल्लागार:ॲड.सोनलबऱ्हाटे

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे कुटुंबनायक श्री. ललित दादा पाटील,युवा समिती प्रमुख श्री. मयुरेश नरेंद्र कोल्हे आणि समस्त भोरगाव लेवा पाटीदार पंचायत ठाया पाडळसे सदस्यांच्या




वतीने अभिनंदन करण्यात आले.

यावेळी भोरगाव समिती मुंबई विभाग सचिव सौ. भाग्यश्री पाचपांडे यांनी दूरध्वनीवरून नवनिर्वाचित कार्यकारिणीशी संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या.तसेच लेवा पाटीदार समाज मंडळ कल्याणचे कार्याध्यक्ष श्री.युवराज चौधरी सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या निवडीमुळे तरुणांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, समाजाच्या विकासासाठी नवीन कार्यकारिणी कटिबद्ध असल्याचे मत तसेच लेवा पाटीदार समाज मंडळ कल्याण सोबत संलग्न युवा समिती कार्यरत असणार असल्याचे मनोगत नवनिर्वाचित अध्यक्षांनी व्यक्त केले..

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार २३ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# संकटातील जनतेचा खरा आधार – आमदार संदिप भैय्या

## गेवराईत आ. विजयसिंहपंडीत, रनवीर पंडीत मैदानात उतरले..





तुम्ही असे अनेक पुढारी पाहिले असतील की जे फक्त त्यांच्या वरीष्ठ नेत्यांच्या दौऱ्यातच धावताना दिसतात. कारण त्यांना केवळ फोटो काढून घ्यायचे असतात, अधिक कामे मिळवायची असतात. मात्र जनतेच्या खऱ्या संकटाच्या काळात धाव घेणारा एकमेव नेता म्हणजे आमदार संदिप भैय्या. गेल्या १५ दिवसांपासून बीड मतदारसंघात अतिवृष्टीमुळे शेतकरी आणि सामान्य नागरिक संकटात सापडले आहेत. पावसाने अक्षरशः थैमान घातले आहे. पुराच्या पाण्यात अडकलेल्या कुटुंबाला सर्वात आधी आठवण झाली ती संदिप भैय्या आणि त्यांच्या कार्यकर्त्यांची. संदिप भैय्या हे सतत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना धीर देत आहेत, मदत करत आहेत. म्हणूनच सध्याच्या कठीण काळात जनतेला आपल्याच कुटुंबातील सदस्याप्रमाणे वाटणारे नेतृत्व म्हणजे संदिप भैय्या. सरकार मदत करेल तेव्हा करेल, परंतु शेतकऱ्यांच्या अडचणीसरकारपर्यंत पोहोचवणारे,शेतकऱ्यांनापहिला मदतीचा हात देणारे,गोर-गरिब, वंचित-उपेक्षितांना आशेची किरण ठरणारे एकमेव नेते म्हणजे आमदार संदिप भैय्या...

## गेवराईत आ. विजयसिंहपंडीत, रनवीर पंडीत मैदानात उतरले..

संकटकाळी गरज असते की ती आधाराची..अतिवृष्टीमुळे गेवराई मतदारसंघातील पूर्ण शेतकऱ्यांची पिके उद्धस्त झालेली आहे तर मोठमोठ्या नद्या-वड्यांना पूर परिस्थिती निर्माण होऊन अनेक गावांमध्ये नद्या-वड्यांचे पाणी शिरले आहे, या आपत्कालीन परिस्थितीमध्ये गेवराई मतदारसंघाचे मा.आ.अमरसिंह पंडित साहेब व विद्यमान आमदार विजयराजे पंडित हे थेट ग्राउंडवर लोकांसोबत ठाण मांडून आहेत, या आसमानी संकटामध्ये अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना धीर देण्याची काम करत आहेत, शासन-प्रशासन या दोन्ही यंत्रणेला सोबत घेऊन अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मदत करत आहे या गोष्टीचे कौतुक आहे आणि चांगल्या कामाचे कौतुक केलेच पाहिजे..

# सुकळी गावच्या रस्त्याच्या लढ्याला आम आदमी पार्टीच्या मदतीने यश

बीड, २१ सप्टेंबर २०२५ – बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील सुकळी गावाने आपल्या मुख्य रस्त्यावरील अडथळा दूर करण्यासाठी दिलेल्या लढ्याला अखेर यश मिळाले असून, यामध्ये आम आदमी पार्टीने मोलाची भूमिका बजावली. सुकळी गावातून परळी तेलगाव रस्त्यावर जाण्यासाठी एकमेव मार्ग असून तो रेल्वे लाईन क्रॉस करून जातो. यासाठी रेल्वे विभागाने पुलाचे टेंडर काढून काम सुरू केले होते. मात्र, या पुलाच्या कामात दुसऱ्या गावातील काही शेतकऱ्यांची शेती आणि पाण्याचा बोर येत असल्यामुळे त्यांनी काम थांबवले. काही असामाजिक तत्त्वांनीही या कामात अडथळा आणण्याचा प्रयत्न केला.

ही समस्या लक्षात घेऊन आम आदमी पार्टीच्या मदतीने सुकळी गावकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आठ दिवसांचे आंदोलन केले. अखेर आज सोमवार, दिनांक २१ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सुकळी गावकरी, संबंधित शेतकरी, रेल्वे अधिकारी, पोलीस व महसूल प्रशासन यांच्यात बैठक झाली.

या बैठकीत पुढील दहा दिवसांत काम पुन्हा सुरू करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले. शेतकऱ्यांना योग्य मोबदला दिला जाईल आणि त्यांच्या जुन्या बोरसाठी नवीन बोर देण्यात येईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले.

या यशस्वी लढ्यानंतर सुकळी गावच्या ग्रामस्थांनी आम आदमी पार्टीचे मनःपूर्वक आभार मानले आहे यावेळी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे जिल्हा सचिव माऊली भाऊ शिंदे सय्यद सादेक रफिक पठाण मिलिंद पाळणे कलाचंद पालीवाल इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते





## घटस्थापनेने रेणुकागडावर नवरात्र महोत्सवास प्रारंभ अध्यक्षांच्या उपस्थितीत पार पडली घटस्थापना

माहुर: महाराष्ट्राच्या साडेतिन शक्तीपीठापैकी एक असलेल्या श्री रेणुकादेवी मंदिरात आज दि.२२ सप्टें. रोजी स.११ वा.संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश सुनील वेदपाठक यांचे हस्ते आणि सचिव तथा सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तुला, कोषाध्यक्ष तथा तहसीलदार अभिजित जगताप यांचेसह त्यांच्या कुटुंबियांच्या उपस्थितीत घटस्थापना संपन्न झाली.याप्रसंगी 'श्री' ला पारंपरिक अलंकार चढवून महाआरती करण्यात आली. या पूजाविधीचे पौरोहित्य वे. शा. सं. रवी काण्णव,अरविंद देव,अनिल काण्णव, भवानीदास भोपी व शुभम भोपी यांनी केले.




राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला यंदा 100 वर्षे पूर्ण होत आहे. यंदाच्या विजयादशमीपासून संघाच्या शताब्दी वर्षाची सुरुवात होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर यंदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा दसरा मेळावा खास असणार आहे. नागपुरात विजयादशमीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी नुकतंच पत्रकार परिषद घेत याबद्दलची माहिती दिली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद उपस्थित राहणार आहेत. तसेच या कार्यक्रमावेळी सरसंघचालक डॉ. मोहन भागवत हे देखील मार्गदर्शन करणार आहेत.

# दिंडी वस्तीवर २२ नागरिक अडकडे, बाळराजे पवार यांचा तहसीलदार शेळके यांना फोन , बीड जिल्हयात चिंतेचे वातावरण

गेवराई दि. २२ : वार्ताहर : : गेवराई मतदारसंघात असलेल्या नांदूर हवली व खामगावला पाण्याचा वेढा पडल्याने, जवळच असलेल्या दिंडे वस्तीवरची बावीस माणसे अडकली आहेत. एकजण झाडावर चढून बसल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला असून, बीड जिल्ह्यात चिंतेचे वातावरण आहे. दरम्यान, बीड जिल्हा प्रशासन घटनास्थळी दाखल झाले असून, युवा नेते बाळराजे पवार यांनी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना तातडीने दूरध्वनीवरून फोन करून माहिती दिली. पवार यांनी घटनास्थळावरून आढावा घेऊन, कानडी पिंपळगाव येथील बेटा जवळच्या नागरिकांची माहिती घेतली. रात्री आठ वाजता बेटा जवळ थांबलेल्या उप विभागीय अधिकारी कविता जाधव यांच्याशी चर्चा केली. या बेटावर १३ नागरिक अडकून आहेत. गेवराई चे युवा नेते बाळराजे पवार हे सुद्धा नांदूर हवेली गावाच्या नव्या वस्तीवर ठाण मांडून होते. बाळराजे पवार यांनी तहसीलदार शेळके यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून, गावात नागरीक अडकले आहेत. तातडीने मदत करा, अशी मागणी केली. दरम्यान, गावाला सुरक्षित बाहेर काढा,




अशी मागणी होऊ लागली असून ; वस्तीवर अडकलेले लोक जीव मुठीत धरून बसलेत. त्यांना कसे बाहेर काढायचे, असा प्रश्न पडला आहे. तहसीलदार शेळके यांनी सदरील परिस्थितीची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली आहे. दरम्यान, सोमवार ता. २२ रोजी सायंकाळपर्यंत गाव आणि वस्तीवर अडकलेल्या नागरीकांच्या जिवाला धोका निर्माण झाला असून, रात्र झाल्याने चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

बाळराजे पवार यांनी रात्री आठ वाजता दोन्ही ठिकाणी भेटी देऊन नागरिकांना धीर दिला.

# आणखी 25 लाख महिलांना मिळणार मोफत गॅस कनेक्शन, उज्ज्वला योजनेच्या विस्ताराला मंजूरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात उज्ज्वला योजनेची सुरुवात केली होती. याअंतर्गत देशातील लाखो महिलांना मोफत गॅस कनेक्शन देण्यात आले होते. आता सरकारने या योजनेच्या विस्ताराला परवानगी दिली आहे. याअंतर्गत आता आणखी 25 लाख महिलांना मोफत एलपीजी कनेक्शन दिले जाणार आहे. सरकारने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलल्याचे यातून स्पष्ट होत आहे. समोर आलेल्या माहितीनुसार केंद्र सरकारने 2025-26 या आर्थिक वर्षात प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत 25 लाख नवीन एलपीजी कनेक्शन देण्यास मंजूरी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियावर मंत्री हरदीप सिंग पुरी यांची पोस्ट शेअर करत लिहिले की, "नवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर, मी उज्ज्वला कुटुंबाशी संबंधित सर्व माता आणि भगिनींना मनापासून शुभेच्छा देतो. सरकारचे हे पाऊल या शुभ मुहूर्तावर केवळ आनंद देणार नाही तर महिला सक्षमीकरणाच्या दिशेने आपला संकल्पही बळकट करेल." सरकारच्या या निर्णयानंतर उज्ज्वला कुटुंबातील सदस्यांची संख्या 10.60 कोटींवर पोहोचणार आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी याबाबत माहिती देताना म्हटले की, "नवरात्रीच्या सुरुवातीलाच, उज्ज्वला योजनेअंतर्गत 25 लाख डिपॉझिट-फ्री गॅस कनेक्शन देण्याचा निर्णय हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महिलांचा आदर करण्याच्या वचनबद्धतेचा आणखी एक पुरावा आहे. यामुळे माता आणि बहिणींचा आदर आणि सक्षमीकरण करण्याचा आमचा संकल्प आणखी दृढ होत आहे.' केंद्र सरकार 2050 रुपये खर्च करणार

या विस्ताराबाबत बोलताना हरदीप सिंग पुरी म्हणाले की, "भारत सरकार आगामी काळात प्रत्येक कनेक्शनवर 2050 रुपये खर्च करणार आहे. यातून लाभार्थी महिलांना मोफत एलपीजी सिलेंडर, गॅस स्टोव्ह, रेग्युलेटर मोफत दिले जाणार आहे. उज्ज्वला योजना ही फक्त एक योजना नसून ती मोठ्या क्रांतीची मशाल बनली आहे. या योजनेची ज्योत देशाच्या कानाकोपऱ्यात म्हणजे दुर्गम भागात पोहोचली आहे. सरकार सध्या एलपीजी सिलेंडरवर 300 रुपयांचे अनुदान देत आहे, त्यामुळे 10.33 कोटींहून अधिक उज्ज्वला लाभार्थी कुटुंबांना गॅस सिलिंडर फक्त 553 रुपयांमध्ये मिळत आहे. ही किंमत जगभरातील बहुतेक एलपीजी उत्पादक देशांपेक्षा कमी आहे."




This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com